# उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,

## जिल्हा अभियान कक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वाशिम

**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष ,तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष व क्षेत्रीय विविध पदे भरण्याकरिता**

## जाहिरात

### जुनी जिल्हा परिषद परिसर ,वाशीम – ४४४५०५

जिल्हा अभियान व्यवस्थान कक्ष,तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष व क्षेत्रीय विविध पदे भरण्यासाठी जाहिरात राज्यात दीनदयाल अंत्योदय योजना - राष्ट्रीय जीवनोन्नती अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना केलेली आहे. या अभियानांतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष व क्षेत्रीय पदे कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याच्या करार तत्वावर भरण्यासाठी इच्छुक उमेदवारांकडुन खालील पदांकरता अर्ज मागविण्यात येत आहे.

### जिल्हा अभियान कक्षातील पदांची संख्या

| अ क्र | पदाचे नांव | मासिक CTC (रु.) | पद संख्या | आरक्षण | | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | खुला | |
| 1 | #लेखापाल | १५,०००/- | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| 2 | #प्रशासन सहाय्यक | १५,०००/- | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| 3 | #डेटा एन्ट्री ऑपरेटर | १०,०००/- | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| 4 | #शिपाई | ८,०००/- | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |

### तालुका अभियान कक्षातील पदांची संख्या

| अ क्र | पदाचे नांव | मासिक CTC (रु.) | पद संख्या | | आरक्षण | | | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | खुला | अपंग | | |
| 1 | @प्रभाग समन्वयक | २०,५००/- | ४९ | ०७ | ०४ | ०२ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०७ | २२ | ०२ ०१ खुला ०१ इमाव | | ४९ |
| | | | सर्वसाधारण | ०५ | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०५ | १४ | | | ३४ |
| | | | महिला | ०२ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ | ०८ | | | १५ |
| 2 | *प्रशासन/ लेखा सहाय्यक | १५,०००/- | ०६ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०३ | ० | | ०६ |
| | | | सर्वसाधारण | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ० | | ०४ |
| | | | महिला | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ० | | ०२ |
| 3 | *डेटा एन्ट्री ऑपरेटर | १०,०००/- | ०६ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०३ | ० | | ०६ |
| | | | सर्वसाधारण | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ० | | ०४ |
| | | | महिला | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ० | | ०२ |
| 4 | *शिपाई | ८,०००/- | ०६ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०३ | ० | | ०६ |
| | | | सर्वसाधारण | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ० | | ०४ |
| | | | महिला | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ० | | ०२ |

टिप – १) @ प्रभाग स्तरावरील पदे २) * तालुका कक्षातील पदे ३) # जिल्हा कक्षातील पदे ४) महिलांसाठी राखीव पदे उपलब्ध न झाल्यास त्या त्या प्रवर्गातुन पद भरती करण्यात येईल. प्रभाग समन्वयक या एकुण ४९पदापैकी ०२ पद अपंगासाठी राखीव आहे.

वरील पदासाठी पात्रता निकष, वयोमर्यादा, कामाचे स्वरुप व ऑनलाईन अर्ज व इतर तपशीलासाठी कृपया www.washim.nic.in किंवा www.umed.in किंवा https://www.zpwashim.in या संकेतस्थळास भेट दयावी. तरी इच्छुक उमेदवार दिनांक ०५/०९/२०१८ ते १९/०९/२०१८ रोजी रात्री ११:५९ वाजेपर्यत http://washimmsrlm.govrecruit.in या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करुन शकतात. अभियानाच्या गरजेनुसार पदसंख्येत, पदस्थापनेच्या ठिकाणात, अटी व शर्तीमध्ये बदल आणि कोणतीही सुचना न देता प्रक्रिया रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हा अभियान संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांच्याकडे राखीव ठेवण्यात आले आहे.

जिल्हा अभियान संचालक तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, वाशिम

**महाराष्ट्र शासन**

**उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, वाशिम कंत्राटी पद भरती – २०१८**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वाशिम**

**जुनी जिल्हा परिषद परिसर, वाशिम – ४४४५०५**

---

जा.क्र/एमएसआरएलएम/वाशीम/पदभरती/ 41 /२०१८ दिनांक :- ०४ /०९/२०१८

राज्यात दीनदयाल अंत्योदय योजना - राष्ट्रीय जीवनोन्नती अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना केलेली आहे. या अभियानांतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष व क्षेत्रीय पदे कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याच्या करार तत्वावर भरण्यासाठी इच्छुक उमेदवारांकडुन http://washimmsrlm.govrecruit.in या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे. त्या व्यतिरिक्त **इतर कोणत्याही पध्दतीने** अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

**परीक्षेचे वेळापत्रक**

| **अ.क्र** | **तपशील** | **कालावधी** |
|---|---|---|
| 1. | ऑनलाईन अर्ज सादर करण्याची तारीख व अंतीम तारीख | ०५/०९/२०१८ ते १९/०९/२०१८ |
| 2. | बँकेत चलान भरण्याची अंतीम तारीख | २१/०९/२०१८ |
| 3 | सर्व पदांच्या लेखी परीक्षेसाठी पात्र /अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | २५/०९/२०१८ |
| 4. | परीक्षेचे ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | ०१/१०/२०१८ |
| 5 | लेखी परीक्षा दिनांक | १४/१०/२०१८ |
| 6. | उत्तर तालिका प्रसिध्द करणे | १५/१०/२०१८ |
| 7. | उत्तर तालिकेवर आक्षेप मागविण्याचा वेळ व दिनांक | १६/१०/२०१८ ते १८/१०/२०१८ दु. ४ पर्यंत |
| 6. | सर्व पदांसाठी लेखी परीक्षेचा निकाल जाहीर करणे | २४/१०/२०१८ |
| 8. | सर्व पदांसाठी लेखी परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | २४/१०/२०१८ |
| 9. | प्रभाग समन्वयक पदासाठी मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे (१:५ प्रमाणे) | २४/१०/२०१८ |
| 10. | प्रभाग समन्वयक पदासाठी लेखी परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी करणे | २५/१०/२०१८ ते २८/१०/२०१८ |
| 11 | इतर सहाय्यक पदासाठी लेखी परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी करणे | २५/१०/२०१८ ते २८/१०/२०१८ |
| 12. | मौखिक परीक्षांचे आयोजन (फक्त प्रभाग समन्वयक पदासाठी ) | २५/१०/२०१८ ते २८/१०/२०१८ |
| 13. | सर्व पदांची अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणे | ३०/१०/२०१८ |

**उपरोक्त वेळापत्रकामध्ये होणा-या बदलाबाबत संकेतस्थळावर वेळोवेळी खात्री करण्याची जबाबदार संबंधित उमेदवारांची राहील. तसेच पात्र उमेदवाराचे अर्जामध्ये नमुद केलेले कागदपत्रे व छाणनीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्रामध्ये तफावत असल्यास, सदर उमेदावाराला निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरण्यात येईल.**

1. **उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान जिल्हास्तरीय पदांसाठी शैक्षणिक पात्रता विषयक अटी**

| अ.क्र | पदाचे नांव | आवश्यक शैक्षणिक आर्हता | एकुण अनुभव (किमान वर्ष |
|---|---|---|---|
| 1. | लेखापाल (Accountant) | **वाणिज्य शाखेतील पदवी**<br>MS-CIT किंवा मान्यता प्राप्त संस्थेची समकक्ष परिक्षा उत्तीर्ण व Tally ची परिक्षा उत्तीर्ण आवश्यक | **किमान 3 वर्ष**<br>पदवी परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्ष लेखाविषयक कामाचा अनुभव<br>अनुभव हा पदवी परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर गृहीत धरण्यात येईल. |
| 2. | प्रशासन सहाय्यक (Admin Asst.) | **कोणत्याही शाखेतील पदवी**<br>इंग्रजी टायपिंग वेग 40 प्रति मिनीट शब्द, आणि मराठी टायपिंग वेग 30 प्रति मिनीट शब्द परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. व<br>MS-CIT किंवा मान्यता प्राप्त संस्थेची समकक्ष परिक्षा उत्तीर्ण | **किमान 3 वर्ष**<br>पदवी परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्ष प्रशासकीय कामाचा अनुभव.<br>अनुभव हा पदवी परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर गृहीत धरण्यात येईल. |
| 3. | डेटा एन्ट्री ऑपरेटर | **माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण**<br>इंग्रजी टायपिंग वेग 40 प्रति मिनीट शब्द, आणि मराठी टायपिंग वेग 30 प्रति मिनीट शब्द परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. व<br>MS-CIT किंवा मान्यता प्राप्त संस्थेची समकक्ष परिक्षा उत्तीर्ण आवश्यक | **किमान 3 वर्ष**<br>माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्ष डेटा एंट्री (संगणक परिचालन) कामाचा अनुभव<br>अनुभव हा माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर गृहीत धरण्यात येईल. |
| 4. | शिपाई | **10 वी ची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.** | **किमान 3 वर्ष**<br>शासकीय कार्यालय/संस्था/कंपनी मधील कामाचा अनुभव असावा .<br>अनुभव हा 10 वी परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरचा गृहीत धरण्यात येईल. |

2. **उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान तालुका स्तरीय पदासाठी शैक्षणिक पात्रता विषयक अटी**

| अ.क्र | पदाचे नांव | आवश्यक शैक्षणिक आर्हता | एकुण अनुभव (किमान वर्ष |
|---|---|---|---|
| 1. | प्रभाग समन्वयक | **कोणत्याही शाखेतील पदवी परिक्षा उत्तीर्ण-**<br>BSW किंवा B.sc Agriculture किंवा MSW किंवा MBA किंवा PG in Rural Development किंवा PG in Rural Management यांना प्राधान्य राहील. | **किमान 3 वर्ष**<br>पदवी परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर जोखीम प्रवण गट (महिला,अपंग,SC/STसह) सामाजिक समावेश व संस्था बांधणी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | विषयक कामाचा कमीत कमी 3 वर्षाचा ग्रमीण विकास, सामाजिक समावेशन व संस्था बांधणी, गरीबी निर्मुलन, उपजिविका कार्यक्रम अनुभव<br>अनुभव हा पदवी परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरचाच गृहीत धरण्यात येईल. |
| 2. | प्रशासन व लेखा सहाय्यक | **वाणिज्य शाखेतील पदवी**<br>इंग्रजी टायपिंग वेग ४० प्रति मिनीट शब्द, आणि मराठी टायपिंग वेग 30 प्रति मिनीट शब्द परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. व<br>MS-CIT किंवा मान्यता प्राप्त संस्थेची समकक्ष परिक्षा उत्तीर्ण व Tally ची परिक्षा उत्तीर्ण आवश्यक | **किमान 3 वर्ष**<br>पदवी परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्ष प्रशासकीय व लेखाविषयक कामाचा अनुभव<br>अनुभव हा पदवी परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर गृहीत धरण्यात येईल. |
| 3. | डेटा एन्ट्री ऑपरेटर | **माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण**<br>इंग्रजी टायपिंग वेग 40 प्रति मिनीट शब्द, आणि मराठी टायपिंग वेग 30 प्रति मिनीट शब्द परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. व<br>MS-CIT किंवा मान्यता प्राप्त संस्थेची समकक्ष परिक्षा उत्तीर्ण आवश्यक | **किमान 3 वर्ष**<br>माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 डेटा एंट्री (संगणक परिचालन) कामाचा अनुभव<br>अनुभव हा माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर गृहीत धरण्यात येईल. |
| 4. | शिपाई | **10 वी ची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.** | **किमान 3 वर्ष**<br>शासकीय कार्यालय/संस्था/कंपनी मधील कामाचा अनुभव<br>अनुभव हा 10 वी परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरचाच गृहीत धरण्यात येईल. |

## 3. वयोमर्यादा :-

उमेदवारांची वयाची किमान व कमाल मर्यादा ही दिनांक ०३/०९/२०१८ रोजीच्या दिनांकास परिगणित करण्यात येईल.

सर्व साधारण उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

उच्च वयोमर्यादेत खालील बाबतीत शिथिलक्ष्म आहे. त्यानुसार खालील समांतर आरक्षणातील व या जाहिरातीत नमुद प्रवर्गातील

उमेदवार अर्ज करु शकतात.

3.1 अपंग उमेदवारांसाठी : ४५ वर्षापर्यत

3.2 प्रकल्पग्रस्त भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी : ४५ वर्षापर्यत

3.3 माजी सैनिक उमेदवारांसाठी : सशस्त्र दलातील सेवेइतका कालावधी अधिक 3 वर्षे तसेच अपंग माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग ३ मधील पदासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत

3.4 पदवीधर अंशकालीन : ४६ वर्षापर्यंत

3.5 खेळाडु उमेदवारांसाठी : ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल

4. **परीक्षा शुल्क :- शासन निर्णय साप्रवि, दिनांक ११ मार्च २०१५ अन्वये**

प्रस्तुत भरती प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क राहील.

| मागासवर्गीय उमेदवाराकरीता | खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरीता | शेरा |
|---|---|---|
| २७४/- | ३७४/- | चलान शुल्क वेगळयाने भरावे लागेल |

वरील प्रमाणे परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील.

**5. Online पध्दतीने अर्ज सादर करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

**5.1अर्ज करण्याची पध्दत - Online अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सुचना** washimmsrlm.govrecruit.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. उमेदवार त्याचा अर्ज internet सुविधा असलेल्या ठिकाणी भरु शकेल .

5.2. washimmsrlm.govrecruit.in या संकेतस्थळावर रजिष्ट्रेशन करावे.

5.3. मागास वर्गीय उमेदवाराकरीता रु. २७४/- व खुल्या संवर्गातील रु ३७४/- परिक्षा शुल्क संकेतस्थळावरुण प्राप्त चलान व्दारे सेंट्रल बँक ऑफ इंडिया मध्ये भरणा करण्यात यावे. तसेच बँक ट्रान्झेक्शन आय -डी अपडेट करण्यात यावा. ट्रान्झेक्शन आय-डी अपडेट न केल्यास उमेदवारास अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

5.4. अर्ज भरण्यापर्वी उमेदवाराने खालील प्रमाणे नजीकच्या काळातील छायाचीत्र व स्वाक्षरी ईमेज soft कॅापी स्वत:कडे ठेवावी.

| तपशील | Size limet | Details |
|---|---|---|
| अर्जदाराचे अलीकडील पासपोर्ट छायाचीत्र | JPEG FORMAT मधील 20 KB पर्यंत | लांबी *रुदी प्रमाण (PROPORTION) 3.5 CM*4.5cm असावे छायाचीत्र समोर चेहरा असावे छायाचीत्राचा 75 % भाग चेहरा असावा. |
| अर्जदाराची स्वाक्षरी | JPEG FORMAT मधील 20 KB पर्यंत | को-या पांढ-या कागदावर गडद जाड पॉईट च्या पेनने केलेले असावे 2.5cm*1.5cm असावे |
| परिक्षा शुल्क भरल्याची रोख पावती (Scan soft copy ) | | उमेदवाराने परिक्षा शुल्काची प्रत बँकेत भरल्यानंतर scan करुण online अर्जासोबत जोडावे. |

5.5 उमेदवाराचे फोटो , रोख पावती, व सही ऑनलाईन अर्ज भरतांना upload करणे आवश्यक आहे. या व्यतीरीक्त इतर कागदपत्रे upload करण्याची गरज नाही

5.6 त्यानतंर open होणा-या पेजवरील पदाचे नाव निवडावे व अर्जातील इतर आवश्यक सर्व माहिती भरावी.

5.7 अर्जदाराने upload केलेले image सुस्पष्ट नसल्सास ता अपात्र ठरविला जाउ शकतो.

5.8 सदर पेज वरील सर्व माहिती भरल्यानंतर व छायाचीत्र आणि स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर submit यावर click करावे.

5.9 अर्जात भरलेली माहिती परिपुर्ण असल्यास येणा-या मेसेज बॉक्स मध्ये भरती प्रकियेतील पुढील बाबीसाठी (उदा. अर्जाची पात्रता पाहणे, प्रवेश पत्र काढणे. ) जन्म तारीख आवश्यक असल्याने त अचुक

असल्याची खात्री करावी अथवा बदल करावयाचा असल्यास edit form यावर क्लीक करुण फार्ममध्ये बदल करा असा संदेश दिसेल

5.10 अर्जात भरेलेली माहीती परिपुर्ण असल्याची खात्री असल्यास अथवा चुकीची माहिती अचुक भरल्यानंतर save & continue या वर क्लीक करावे. त्यानंतर अर्जाचा id ऑनलाईन परिक्षा भरण्याची अथव विहीत केलेले परिक्षा शुल्क जमा करण्याची अंतिम तारीख याबाबतची माहिती उमेदवारास दिसेल.

5.11 तयार झालेले form id भरतीच्या संपुर्ण पक्रीयेत उपयुक्त असल्याने तो, उमेदवाराने सांभाळुन/नोंद करुन ठेवावा यानंतर अर्जात भरलेली माहिती उमेदवाराला बदलता येणार नाही

5.12 यानंरत उमदेवाराने अर्जात नमुद केलेली सर्व माहीती व तपशील अचुक असुन कोणतेही माहिती अथवा तपशील चुकीचा अथवा खोटा आढल्यास अर्ज कोणत्याही टप्पयावर रदद करण्यात येईल याची जाणीव आहे. असे प्रतिज्ञा पत्र मान्य करुन submit my form यावर click करावे. त्यानंतर अर्ज सादर होईल.

5.13 http://washimmsrlm.govrecruit.in या संकेत स्थळावरील अर्जाची पात्रता या सदरावर क्लीक करावे. त्यानंतरच्या पेजवर पदाची निवड करवी. दिलेली माहिती पुर्ण भरावी.

5.14 पात्र ठरलेल्या अर्जाची भरलेल्या अर्जाची पोच पावती यावर क्लीक करावे. त्यानंतरच्या page वर पदाची निवड करुन form id व Date of Birth ही माहिती भरुन प्रिंट रिसीप्ट यावर क्लीक् करावे. त्यानंतर उमदवाराच्या अर्जाची पोच पावती उपलब्ध होईल.

5.15 असा E-mail व SMS प्राप्त झाल्यावर उमेव्दार Form ची पोच पावती काढून घेउ शकतो. सदरील Form पोचपावती Printकाढन्याची बाब व्यकत्ीक आहे.

5.16 अपात्र ठरलेल्या अजाचे बाबतीत आक्षेप असल्यास मदतीचा दुरध्वनी क्र. ०७२६४०३०३०२ यावर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते ०५:४५ पर्यत संपर्क् साधावा अथवा आपली http://washimmsrlm.govrecruit.in या ईमले संपर्कावर माहिती कळवावी.

5.17 लेखी परिक्षा उमेदवाराचे कोणतेही कागदपत्र तपासणी न करता घेतली जाणार असल्याने केवळ लेखी परिक्षेस बसु दिल्यामुळे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.

5.18अर्ज एकदा ऑनलाईन सादर केल्या नंतर त्यामध्ये कोणतेही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

5.19 प्रवेशपत्र-जाहिरातीतील नमुद पदाकरीता परिक्षा प्रवेश पत्र उमेदवारास washimmsrlm.gov.recruit.in / washimumed. govrecruit.in संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर पत्र पोस्टाने पाठवले जाणार नाही. परीक्षेच्या वेळी उमेदवारांनी प्रवेश प्रमाणपत्र आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वत:चे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील. (उदा. आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र)

## 6. परीक्षेचे स्वरुप व निवड पध्दती

| अ.क्र | पदाचे नांव | गुण |
|---|---|---|
| १ | प्रभाग समन्वयक | (८० लेखी व मुलाखत २० असे एकुण १०० गुण) |
| २ | १. प्रशासन / लेखा सहाय्यक २. डेटा एन्ट्री ऑपरेटर ३. शिपाई | १०० लेखी गुण |

6.1लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल. निगेटिव्ह मार्किग पध्दत असणार नाही. वरीलपैकी प्रभाग समन्वयक या पदाकरीता दिनांक १५/०३/२०१८ च्या पत्रानुसार लेखी परीक्षेमध्ये मराठी १४ गुण, इंग्रजी १४ गुण, सामान्य ज्ञान १४ गुण, बौध्दिक चाचणी १४ गुण, सामाजीक शास्त्र १४ गुण व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान १० गुण या प्रमाणे ८० गुणांची लेखी परीक्षा व २० गुणांची (मुलाखत) घेऊन गुणवत्तेच्या आधारे निवड करण्यात येईल. व १). प्रशासन / लेखा सहाय्यक २). डेटा एन्ट्री ऑपरेटर ३). शिपाई या पदाकरीता दि.१५/०३/२०१८ च्या पत्रान्वये लेखी परीक्षेमध्ये मराठी २० गुण, इंग्रजी २० गुण, सामान्य ज्ञान २० गुण, बौध्दिक चाचणी २० गुण, व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान २० गुण या प्रमाणे १०० लेखी परीक्षा असुन गुणानुक्रमे उमेदवाराची निवड करण्यात येईल.

6.2 सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१९/१०/२०१७ मधील परिच्छेद क्र.६(२) नुसार ज्या पदाकरीता पदवी ही कमीत कमी आर्हता आहे. अशा पदाकरीता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विदयापीठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या सामान राहील. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी ) च्या दर्जाच्या समान राहील.

6.3 परीक्षेचा निकाल तयार करतांना जया उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रनीमं/१२१५/(प्र.क्र.५५/१५)/१३-अ दि.०५/१०/२०१५ मधील निकषावर लावला जाईल.

6.4 शासन परिपत्रक क्रमांक -एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.३१/९८/*१६-अ दि.१६ मार्च १९९९ तसेच शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०१२/प्रक.क्र१६/१२/१६-अ दि.१३ ऑगस्ट २०१४ मधील तरतुदीनुसार समांतर आरक्षण कार्यान्वित करण्यासाठी विहित केलेली कार्यपध्दती अनुसरली जाईल.

## 7. सर्व पदांकरीता सर्वसाधारण अटी व शर्ती

7.1 प्रकल्पग्रस्त भूकंपग्रस्त उमेदवारांना संबंधित जिल्हयातील जिल्हाधिकारी/जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे कडील प्रकल्पग्रस्त भूकंपग्रस्त प्रमाणपत्राच्या सत्यप्रती प्रमाणपत्र तपासणीवेळी सादर कराव्या लागतील. प्रत्यक्ष निवड झालेल्या उमेदवारांना प्रमाणपत्राची पडताळणी झाल्यानंतर नियुक्तीबाबत विचार करण्यात येईल.

7.2 अशंकालीन उमेदवारांनी त्यांच्या शासकीय अथवा निमशासकीय सेवेतील नियुक्त्यामध्ये तीन वर्ष पुर्ण अंशकालीन म्हणुन काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये अनुभवाची नोंद केलेल्या सर्व अंशकालीन उमेदवारांना अनुभव प्रमाणपत्र तपासणी वेळी सादर करावे लागेल. प्रत्यक्ष निवड झालेल्या उमेदवारांच्या प्रमाणपत्राची पडताळणी झाल्यानंतरच नियुक्तीबाबत विचार करण्यात येईल. नियुक्ती आदेश निर्गमित करण्यापुर्वी उमेदवारांचे अशंकालीन म्हणुन काम केल्याबाबतचे तहसील कार्यालय व रोजगार स्वयं रोजगार कार्यालयाने दिलेले मुळप्रमाणपत्र जमा करुन घेण्यात येईल.

7.3 अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडुसाठी असलेले आरक्षण व वयोमर्यादेच्या शिथिलतेबाबत शासन निर्णय शालेय शिक्षण् व क्रिडा विभाग क्रमांक रक्रीधो-२००/प्र.क्र६८/क्रीयुसे-२ दिनांक ३० एप्रिल २००५ मधील तरतुदीनुसार खेळाडुसाठी राखीव असलेल्या पदावर निवडीसाठी आर्हता पुढील प्रमाणे असेल. सदर पदासाठी त्या त्या खेळाच्या वैयक्तिक अथवा सांघीक क्रिडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम,व्दितीय, तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडु राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळाच्या महाराष्ट्र ऑलंपिक असोसिएशनने स्वत:आयोजित केले

असाव्यात. वैयक्तिकरीत्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूचा यासाठी विचार करता येणार नाही. खेळाडु आरक्षित पदावर नेमणूकी करीता ज्या खेळाडूची निवड होईल. त्यंची प्रमाणपत्र संचालक क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कडे तपासणीसाठी पाठविण्यात येईल व प्राप्त अहवालानुसार नियुक्तीबाबत विचार करण्यात येईल.

7.4 शासन परिपत्रक क्रमांक पीआरई - २००४/३८५५/प्राशी १.१ दिनांक २ जुन २००५नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसताना सैनिक सेवेत मृत्यु झालेल्या किंवा अपंगत्व येऊन नौकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्य कुटूंबातील फक्त जवानाची पत्नी अपंग जवानाची पत्नी यांना नियुक्ती देण्याचे धोरण आहे. त्यांनतर त्यांची अविवाहीत मुलगी अविवाहीत मुलगा यांचा समावेश आहे व त्यांच्या १५टक्के समांतर आरक्षणातून विचार करण्यात येईल.

7.5 अनुसूचित जाती व जमाती वगळता विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागासवर्गीय व विशेष मागासवर्गीय प्रवर्ग या मधील उमेदवारांनी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत सक्षम अधिका-यांचे कागदपत्र तपासणीचे दिनांकास वैध असणारे नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

7.6 शासकीय व निमशासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिका-यांची मंजुरी घेतल्याचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. अर्जात विभागप्रमुखांनी दिलेल्या परवानगीचा क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे.

7.7महिलांच्या आरक्षणाबाबत शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रमांक ८२/२००१/मसेआ००/प्र.क्र.४१५/का-२दि. २५ मे २००१ मधील तरतुदीनुसार खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांना सदर शासन निर्णयात परीशिष्ट - ३ मध्ये दिलेल्या खुल्या प्रवर्गातील उन्नत व्यक्ती / गट (क्रिमिलेअर) या मध्ये मोडत नसल्याचे सक्षम अधिका-यांचे कागदपत्र तपासणीचे दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच पुरेशा प्रमाणात महिला उमेदरवार उपलब्ध न झाल्यास इतरत्र आदलाबदल न करता त्याच प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधुन राखीव असलेली पदे भरण्यात येतील.

7.8 सामान्य प्रशासन अधिसुचना क्रमांक एसआरव्ही-२००/प्र.क्र.(१७/२०००)१२ दिनांक २८ मार्च २००५ व सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही - २०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक १ जुलै २००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. (अविवाहीत उमेदवारांनी लागू नाही असे नमुद करुन सदर प्रतिज्ञा पत्र सादर करणे आवश्यक आहे.)

7.9 सामान्य प्रशासन विभागकडील शासन निर्ण क्र.बीसीसी २०११/ प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दिनांक १२ डिसेंबर २०११ नुसार मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाचे दिनांकापासुन ६ महिन्यच्या आत सादर करण्याच्या अटीवर व मा. सर्वाच्च न्यायालायाचे आदेशाचे अधीन राहुन नियुक्ती दिली जाईल सहा महीन्याच्या आत वैधता प्रमाणपत्रासाठी परिपुर्ण प्रस्ताव कार्यालयामार्फत समितीकडे सादर करुन जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास कोणतीही नोटीस न देता सेवा समाप्त करण्यात येईल. नियुक्ती दिल्यानंतर जात पडताळणीसाठीच्या प्रस्ताव हा संबंधिताकडे सादर केल्याची पोच उमेदवाराने कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

7.10 अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्राच्या छाननी शिवाय परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती किंवा कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवलयाचे निदर्शनास आल्यास त्यांचे पुर्व चरित्र बरोबर नसल्याचे आढळल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. किंवा नियुक्ती दिल्यानंतर निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्यानंतर या बाबत उमेदवाराचा कोणत्याही प्रकाराचा उजर एकुण घेतला जाणार नाही.

7.11 या जाहीरातीत नमुद केलेल्या पदावर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या आधीन असेल.

7.12 उमेदवार हा महाराष्ट्रातील रहीवासी असावा. उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असल्याने डेमिसाईल प्रमाणपत्र प्राधिकृत अधिका-यांकडुन घेतलेले असावे. डोमिसाईल प्रमाणपत्र नसल्यास महाराष्ट्रातील जनमाचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील. उपरोक्त बाबत वेळोवेळी विहित केलेल्या सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

7.13 शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांच्या नियुक्ती प्राधिका-यांची परवानगी घेऊन अर्ज करावा. निवड झालेल्या उमेदवारांना सदर पत्राची प्रत प्रमाण्पत्र तपासणीवेळी सादर करावी लागेल.

7.14 वेगवेगळया पदासाठी वेगवेगळे अर्ज सादर करावे लागेल. परंतु एकाच वेळेस वेगवेगळया पदाची परीक्षा आली तर एकाच पदाच्या परीक्षेसाठी उमेदवाराला स्वेच्छेने बसता येईल.

7.15 अनुभव प्रमाणपत्र मोघम नको. अनुभव प्रमाणपत्रावर संस्थेचा/कार्यालयाचा शिक्का व सही तसेच जावक क्रमांक असणे आवश्यक आहे. संबंधित पदाचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल. अनुभव प्रमाणपत्र देणा-या संस्थेची प्रत्यक्ष तपासणी करुन खात्री पटल्यावर संबंधित अनुभव प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

8.16 नॉनक्रिमिलेयर प्रमाणपत्र नजीकच्या काळात काढलेले असावे. (विमुक्त जाती व भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्ग / इतर मागास प्रवर्ग करीता आवश्यक) सदर प्रमाणपत्र दिनांक ३१ मार्च २०१९ च्या आर्थिक वर्षा पर्यंत वैध्य असणे आवश्यक आहे. वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही. जर उमेदवाराचे खुल्या प्रवर्गाचे परीक्षा शुल्क भरले असेल तर त्यांचा अर्ज प्रवर्गातील ग्राहय धरण्यात येईल.

7.17 जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात नांव नोंदणी केली असली तरीदेखील वरील पदासाठी रीतसर Online अर्ज अधिकृत संकेतस्थळावर भरणे, विहित परीक्षा शुल्काचा बँकेत भरणा करणे आवश्यक आहे.

7.18 नैसर्गिक आपत्तीमुळे विहित दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर अध्यक्ष उमेद एमएसआरएलएम निवड समिती तथा मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद, वाशिम हे ठरवतील त्या प्रमाणे सोयीच्या दिवशी लेखी व मुलाखती घेण्यात येतील. याबाबत washimmsrlm.gov.recruit.in / washimumed.govrecruit.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येईल.

7.19 सदर जाहिरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत कमी जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्या बाबत अर्जदाराला कोणत्याही दावा करता येणार नाही.परीक्षेचा प्रकार पदांची संख्या समांतर आरक्षण यात बदल करणे, परीक्षा स्थगीत करणे / अंशत: बदल करणे इ. सर्व अधिकार हे अध्यक्ष उमेद एमएसआरएलएम निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद, वाशिम स्वत:कडे राखुन ठेवत आहे. कोणत्याही या बाबत कुठल्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

7.20 उमेदवारांनी त्यांचे निवडीबाबत किंवा निवडी नंतर पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणल्यास तसेच पदस्थापनेत बदल करण्याबाबत विनंती केल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल. यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

7.21 शासनाने विहित केलेली शारीरीक पात्रता प्रमाणपत्र व चांगली वर्तणुक असल्याचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

7.22 परीक्षेस पात्र / अपात्र उमेदवारांची यादी, लेखी परीक्षेचा निकाल, प्रारुप निवड यादी, अंतिम निवड यादी व भरतीप्रक्रीयेसंबंधित देण्यात येणा-या सुधारित व अदयावत सुचना कार्यालयाचे नोटीस बोर्डावर तसेच washimmsrlm.govrecruit.in / washimumed.govrecruit.in संकेतस्थळावर

प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. यांची उमेदवारांनी दक्षता घ्यावी.

7.23 उमेदवारांना लेखी परीक्षेस, कागदपत्र तपासणी, मुलाखात ई करीता स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

7.24 प्रस्तुत भरती प्रक्रियेच्या वेळोवेळी शासनाकडुन प्राप्त होणा-या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदरील प्रक्रियेत काही बाबी नमुद करावयाच्या राहिल्यास किंवा अनावधानाने चुकीच्या नमुद केलेलया असल्यास त्या प्रचलित शासन निर्देशानुसार / निर्णयानुसार लागू राहील. जाहिराती बाबत काही शंका असल्यास त्यांनी संबंधित खाते प्रमुख महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, वाशिम यांना कार्यालयीन वेळेत समक्ष भेटावे.

7.25 परीक्षेच्या दिवशी संवर्गनिहाय उत्तरतालीका जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जुनी जिल्हा परिषद परिसर, वाशिम यांच्या कार्यालयात किंवा या कार्यालयाचे ई-मेल आयडी http://washimmsrlm.govrecruit.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

7.26 उत्तर तालीका प्रसिध्द झाल्यानंतर त्यावर आपेक्ष असल्यास 3 दिवसाच्या आत लेखी आक्षेप पुराव्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा अभियान संचालक महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती, वाशिम यांच्या कार्यालयात किंवा या कार्यालयाचे ई-मेल आयडी http://washimmsrlm.govrecruit.in यावर सादर करावेत. उशिरा प्राप्त आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. यांची नोंद घेण्यात यावी.

7.27 जाहिरातीत नमुद अटीत बदल जाहिरातीच्या काही भागात अंशत: बदल व संपुर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष उमेद-MSRLM तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी स्वत:कडे राखुन ठेवले आहेत.

**अध्यक्ष**
**उमेद एम.एस.आर.एल.एम.निवड समिती**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, वाशिम**